

प्रसिद्ध लेखक अश्विन संघी यांच्याशी संवाद साधताना दैनिक भास्कर समूहाचे ब्रॅण्ड हेड विकास सिंग.

# ४७ प्रकाशकांनी नाकारले, पण आज 'बेस्ट सेलर'..

## अश्विन संघी यांचा नवलेखकांना यशाचा कानमंत्र

**नाशिक** | लेखक होण्यासाठी ४७ प्रकाशकांचे दार ठोठावत राहिलो, मात्र प्रतिसाद मिळाला नाही. पण, प्रयत्न सोडले नाहीत. अखेर एका प्रकाशकाला माझी गोष्ट आवडली आणि माझे पहिले पुस्तक प्रकाशित झाले. त्यामुळे जोपर्यंत संधी मिळत नाही तोपर्यंत दार ठोठावत रहा, असा सल्ला अश्विन संघी यांनी नवोदित लेखकांना दिला. 'बुक किपर ते बुक रायटर' या विषयावर दैनिक भास्कर समूहाचे ब्रॅण्ड हेड विकास सिंग यांनी त्यांची मुलाखत घेतली.

या मुलाखतीतून उलगडलेला अश्विन यांचा जीवनप्रवास अनेक नवोदित लेखकांना प्रोत्साहन देणारा ठरला. अश्विन यांनी लिहिलेली 'द रोझाबेल लाइन', 'चाणक्याज चांट' आणि 'द कृष्णा की' ही इंग्रजी पुस्तके बेस्ट सेलर्सच्या यादीत आहेत. एका व्यापारी कुटुंबाचे वातावरण असलेल्या अश्विन यांचा बुक किपरपासून तर लेखकापर्यंत झालेला हा प्रवास या मुलाखतीतून उलगडत गेला. कल्पनारम्य, रहस्यमय कथांत अश्विन यांचा हातखंडा आहे. त्यांच्या मते प्रत्येक माणसाची एक वेगळी कथा असते, ती मांडता आली पाहिजे. लिहिण्याच्या प्रतिभेपेक्षा तुम्हाला कथा सांगण्याची कला हवी. ही कला तुम्हाला वाचकाच्या अधिक जवळ नेते. यावेळी वाचकांनी विचारलेल्या प्रश्नांना संघी यांनी उत्तरे दिली.

## नवोदितांना सल्ला अन् महत्त्वाच्या टिप्सही...

**४७ वेळा प्रकाशकांनी नकार दिल्यानंतर तुमचा आत्मविश्वास कमी झाला नाही का, या प्रश्नाला उत्तर देताना संघी यांनी सांगितले की, माझ्या खोलीत जगातल्या बेस्ट सेलर लेखकांची यादी लावली होती. त्यांना किती प्रकाशकांनी नाकारले, याचा आकडा लिहिलेला होता. १६, २०, ३३ असे आकडे होते. इतक्या श्रेष्ठ लेखकांना प्रथम नाकारण्यात आल्यानंतर स्वीकारण्यात आलं, माझंही तसंच होईल अशी मनाची समजूत काढत होतो, असे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर नवलेखकांना टिप्स देताना ते म्हणाले की, वाचकाला प्रभावित करा, वाचकांचं समाधान करा तरच तुमची पुस्तकं वाचली जातील.**